दैनिक

अन्यायाचा प्रतिकार | महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

• वर्ष १६ वे • अंक २४९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.४ डिसेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज ठाकरे करणार महाराष्ट्र दौरा, आगामी निवडणुकांसाठी 'मनसे' सज्ज

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या मुंबईतील शिवतीर्थ या निवासस्थानी मनसे नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत आगामी निवडणुकांबाबत सविस्तर चर्चा झाली. मनसे निवडणुकांसाठी सज्ज झाली असून, त्याची सुरुवात राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र दौऱ्यापासून होत आहे. राज ठाकरे हे येत्या १४ डिसेंबरपासून महाराष्ट्र दौऱ्यावर असणार आहेत.

महाराष्ट्रात आगामी काळात महापालिकांसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच प्रमुख पक्ष तयारीला लागले आहेत. इतर पक्षांकडून जिल्हानिहाय आढावा बैठका सुरू आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवरच मनसेही प्रत्यक्ष मैदानात उतरणार आहे. तशी तयारी आतापासूनच मनसेकडून सुरू आहे. मुंबईत राज ठाकरे यांच्या नवीन घरातच पक्षाचे नेते आणि सरचिटणीस यांची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत आगामी निवडणुकांच्या संदर्भात विस्तृत चर्चा करण्यात आली आहे.


# रायगडावर राष्ट्रपतींचे हेलिकॉप्टर उतरवण्यास शिवप्रेमींचा विरोध

**दै.रायगड नगरी । महाड**

**किल्ले रायगडवरील होळीचा माळ येथील शिवपुतळ्यासमोर राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे हेलिकॉप्टर उतरविण्यास महाडमधील तीन शिवप्रेमी संघटनांनी विरोध केला आहे. आज विरोध दर्शविणारी तीन निवेदने महाड प्रांतांना देण्यात आली.**

रायगडवरील होळीचा माळ येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा आहे. पूर्वी येथे अति महत्वाच्या व्यक्तिंची हेलिकॉप्टर्स उतरत असत. मात्र हेलिकॉप्टर्सच्या पंख्यांमुळे उडणारी धूळ महाराजांच्या पुतळ्यावर उडत असल्याने रायगडवर हेलिकॉप्टर्स उतरविणे बंद करण्यात आले होते. आता राष्ट्रपतींचे हेलिकॉप्टर सुरक्षा कारणास्तव रायगडवर उतरवावे लागणार आहे. गडावर अन्यत्र मोकळी जागा नसल्याने प्रशासनाने होळीचा माळ येथेच हेलिपॅड तयार करण्यास प्रारंभ केला आहे. आज या ठिकाणी हेलिकॉप्टर उतरविण्यास विरोध करणारी निवेदने कोकण कडा मित्रमंडळ' , श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान आणि श्री छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिनोत्सव समिती या तीन संस्थांच्या वतीने सुरेश पवार, सुरेंद्र मोरे, युवा सेनेचे सिध्देश पाटेकर यांनी महाड प्रांत कार्यालयात अनेक शिवभक्तांसह जावून दिले. यावर प्रशासन काय निर्णय घेते याकडे तमाम शिवप्रेमींचे लक्ष लागले आहे.

## देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद ६ डिसेंबर रोजी रायगडावर



## पनवेल पुरवठा विभागाच्या धडक कारवाईत बायोडिझेल टँकरसह हस्तगत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदेशीररित्या शासनाचा आदेश न जुमानता बायोडिझेल ज्वलनशिल पदार्थाची विक्री करणाऱ्या दोन इसमांसह चार टँकर पनवेल पुरवठा विभागाच्या पथकाने ताब्यात घेतले असून जवळपास २२ लाख ६६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तर या घटनेत एक जण पसार झाला आहे.

पनवेल जवळील उलवे नोड बंबावीपाडा येथे मोठ्या प्रमाणात बायोडिझेल ज्वलनशील पदार्थाचे टँकर उभे करून त्याची विक्री करण्यात येत असल्याची माहिती तहसील कार्यालयाला मिळताच येथील पुरवठा विभागाच्या पथकाने मध्य रात्रीचा सुमारास धडक कारवाई चार बायोडिझलज्वलनशील पदार्थाने भरलेल्या टँकर वर कारवाई जवळपास २२लाख ६६हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. या प्रकरणी संजयकुमार गुप्ता व श्रावण पेमईकुमार यांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. तर एक आरोपी फरार झाला आहे. सदर कारवाई पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रदिप कांबळे नायब तहसिलदार एकनाथ नाईक, कारकून हसन कामनाले, मंडळ अधिकारी, नेरे, सुनील पाटील, तलाठी आदींच्या पथकाने ही कारवाई केली असल्याने अशा प्रकारे बेकायदेशीररित्या बायोडिझेलची विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## राज्य सरकार एसटी कर्मचाऱ्यांवर मोठी कारवाई करण्याच्या तयारीत : ना.अनिल परब

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मेस्मा हा कायदा अत्यावश्यक सेवेला लागतो आणि एसटी ही अत्यावश्यक सेवा आहे. म्हणून एसटीला मेस्मा लागणार नाही हे बोलणे योग्य नाही. ज्या पद्धतीने लोकांना, विद्यार्थ्यांना वेठीस धरले जात आहे ते पाहता आता मेस्मा लावायचा का याबाबत राज्य सरकार लवकरात लवकर विचार करून निर्णय घेईल, असे स्पष्ट करत परिवहन मंत्री अनिल परब यांनी संपकरी एसटी कर्मचाऱ्यांना ईशारा दिला आहे.

संपकरी एसटी कर्मचाऱ्यांवर मेस्मा कायदा लागू करण्यासंदर्भात आपण कायदेतज्ज्ञांशी चर्चा केलेली आहे. आता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार. त्यानंतर मेस्माअंतर्गत कारवाई करायची



की नाही याचा निर्णय घेतला जाईल, असे परिवहन मंत्री परब यांनी म्हटले आहे. परिवहन मंत्री अनिल परब यांनी आज पुन्हा एकदा संप मागे घेण्याचे संपकरी एसटी कर्मचाऱ्यांना आवाहन केले आहे. जर कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतला तर त्यांच्यावर करवाई करण्यात येणार नाही. मात्र, जी आतापर्यंत कारवाई केलेली आहे ती संप मागे घेतला गेला तरी ताबडतोब मागे घेतली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. आता या एसटी कर्मचाऱ्याच्या संपाचा कोणी नेता नाही. मात्र काही लोक एसटी कर्मचाऱ्यांना भडकवत आहेत. अशा भडकवणाऱ्या लोकांवरही राज्य सरकार कारवाई करेल, असा इशाराही परिवहन मंत्र्यांनी दिला आहे. तसेच कर्मचाऱ्यांना कामावर येण्यापासून जे अडवत आहेत, अशा अडवणाऱ्या लोकांवरही आता राज्य सरकार कारवाई करणार असल्याचेही परब यांनी म्हटले आहे.

# कामगार नेते राजेश ठाकूर यांचे अपघाती निधन

**दै.रायगड नगरी । उरण**

भारत पेट्रोलियम कामगारांचे राष्ट्रीय नेते कॉम्रेड राजेश ठाकूर (५७)यांचे गुरुवारी रात्री मोटार वाहन अपघात निधन झाले.

त्यांच्या जाण्याने कामगार वर्गात मोठ्या प्रमाणात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. कामगार नेते कॉम्रेड राजेश ठाकूर एसएफआय या विध्यार्थी संघटनेत विध्यार्थी चळवळीत सक्रिय असलेले पुढे डीवायएफआय या युवक संघटनेचे माजी रायगड जिल्हा अध्यक्ष या पदावर त्यांनी काम केले.त्याचवेळी सुरू असलेल्या बीपीसीएल प्रकल्पग्रस्तांच्या लढ्यात



ही ते सहभागी होते.

याच प्रकल्पात प्रकल्पग्रस्त म्हणून त्यांना नोकरी लागली. त्यामुळे एक चळवळीतील कार्यकर्ता म्हणून लाल बावट्याच्या कामगार संघटनेत त्यांनी कामाला सुरुवात केली. प्रकल्पग्रस्तांच्या लढ्या बरोबरच युवक संघटना, कामगार संघटना तसेच बीपीसीएल मधील कंत्राटी कामगारांच्या शोषणा विरोधात त्यांना संघटित करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला. त्यावेळी एक कायम कामगार कंत्राटी कामगारांना व्यवस्थापना च्या विरोधात संघटित करीत असल्याने व्यवस्थापनाने अनेक प्रकारे त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केला. तरीही कशाचीही पर्वा न करता कंत्राटी कामगाराना न्याय

.../२

## संक्षिप्त...

### शिवसेनेचे मा.खा.आनंदराव अडसूळ यांना मोठा दणका

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई हायकोर्टाने मनी लॉड्रिंग प्रकरणात शिवसेनेचे माजी खासदार आनंदराव अडसूळ यांना मोठा दणका दिला आहे. त्यांचा अटकपूर्व जामीन हायकोर्टाने फेटाळला आहे. मुंबई हायकोर्टाने शिवसेनेचे नेते आणि माजी खासदार अडसूळ यांची याचिका गेल्या महिन्यातही फेटाळली होती. त्यांनी अंमलबजावणी संचालनालयाने दाखल केलेल्या एका प्रकरणात हायकोर्टात धाव घेतली होती.

अमरावतीतील एका सहकारी बँकेतील ९८० कोटी रुपयांच्या घोटाळ्याचं हे प्रकरण आहे. न्या. नितीन जमादार आणि न्या. सारंग कोतवाल यांच्या खंडपीठाने अडसूळ यांची याचिका फेटाळून लावतानाच, म्हटले की, त्यांना अटकेची भीती आहे, तर ते विशेष न्यायालयात अटकपूर्व जामीन याचिका दाखल करू शकतात. अडसूळ यांनी गेल्या महिन्याच्या सुरुवातीला उच्च न्यायालयात याचिका दाखल करून या प्रकरणात ईडीकडून चौकशीसाठी पाठवलेल्या समन्सला आव्हान दिले होते. अडसूळ यांचे वकील अभिनव चंद्रचूड यांनी न्यायालयात सांगितले की, ईडीकडून करण्यात आलेली कारवाई राजकीय विरोधकांच्या इशाऱ्यावर होत आहे. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचे पती रवी राणा यांच्या तक्रारीच्या आधारे ईडीने ही कारवाई सुरू केली आहे, असेही वकिलांनी सांगितले.

## माथेरान नगरपरिषदेची निवडणूक स्वबळावर लढणार : प्रशांत ठाकूर



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाच्या वतीने दोन दिवसीय उत्तर रायगड जिल्हा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन येथील हॉटेल कुमार प्लाझा मध्ये करण्यात आले. यावेळी भाजपचे अनेक मान्यवर उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी पत्रकारांसोबत झालेल्या चर्चेत पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांना आगामी नगरपरिषदेच्या निवडणुकी संदर्भात आपला पक्ष कुणाशीयुती अथवा आघाडी करणार आहेत असे विचारले असता त्यांनी स्वबळावर लढणार आहोत असे स्पष्ट केले आहे.

यावेळी माथेरान मधील अनेक प्रलंबित आणि महत्वपूर्ण अशा विषयावर सुध्दा विस्तृतपणे चर्चा करण्यात आली त्यास भाजपचे ज्येष्ठ नेते माधव भंडारी यांनी सुध्दा अगदी मुद्देसूद पणे उत्तरे दिली. माथेरान मध्ये स्थानिक पातळीवर होणाऱ्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत शक्यतो स्वबळावर निवडणूक जिंकता येणे अशक्यप्राय बाब आहे. त्यामुळे अगोदरच येथील काही पक्षांनी सुध्दा यापूर्वीच स्वबळाचा नारा दिलेला आहे. त्यामुळे पुढील काळात सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपच्या कार्यकर्त्यांची एकप्रकारे गोची होणार आहे. जिल्ह्यात भाजप सर्वंकष दृष्टीने सक्षम आहे. शिवसेनेतुन भाजपवासी झालेल्या एकूण दहा नगरसेवकांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.

यावेळी नगरपरिषदेत भाजपचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जिल्ह्यातील प्रमुख नेतेमंडळी इच्छुक असून यावेळी माथेरानची निवडणूक खऱ्या अर्थाने रंगतदार होणार आहे यात शंका नाही. दोन दिवस चाललेल्या या प्रशिक्षण शिबिरासाठी भाजपचे नेते आशिष शेलार, प्रवक्ते माधव भंडारी, केशव उपाध्ये, पनवेलच्या नगराध्यक्षा कविता चौतमोल, निरंजन डावखरे, अविनाश कोळी, माजी जिल्हाध्यक्ष बाळाराम पाटील, कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, दीपक बेहेरे, राजेश भगत, रमेश मुंढे यांसह तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते. उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, माथेरान शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, किरण चौधरी, प्रदीप घावरे, कुलदीप जाधव, चंद्रकांत जाधव, माजी अध्यक्ष विलास पाटील, संजय भोसले, सुभाष भोसले, राजेश चौधरी, शैलेंद्र दळवी, यांनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

### मुंबई विमानतळाजवळील फनेल झोनमधील इमारतींच्या पुनर्विकासाचे

## अंतिम धोरण नगरविकास विभाग लवकरच निश्चित करणार : ना.एकनाथ शिंदे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई विमानतळ धावपट्टीच्या फनेल झोनमुळे बाधित होणाऱ्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग लवकरच प्रशस्त होणार आहे. या इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या पुनर्विकासाचे सर्वंकष धोरण लवकरच राज्याचा नगरविकास विभाग जाहीर करणार आहे. यासंदर्भात झालेल्या बैठकीत नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबतचे निर्देश दिले असून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मुंबई विमानतळाच्या फनेल झोनच्या विकासासंदर्भात नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली. बैठकीस परिवहन मंत्री अनिल परब, आमदार सर्वश्री संजय पोतनीस, मंगेश कुडाळकर, पराग आळवणी, भाई जगताप तसेच विले पार्लेचे रहिवासी वरुण सरदेसाई,नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, वास्तू रचनाकार श्रीकृष्ण शेवडे आणि विलेपार्लेचे रहिवासी तुषार श्रोत्री आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुंबई विमानतळ धावपट्टीच्या फनेल झोनमुळे .../२

## नवी मुंबई विमानतळ पुनर्वसन क्षेत्रातील भूखंडांच्या विकास परवानगी प्रक्रीयेला गती

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडकोने पुनर्वसन क्षेत्रातीसाठी भारतीय विमान प्राधीकरणाचे इमारतीच्या अनुज्ञेय उंचीसंदर्भात २०१५ साली सरसकट ना-हरकत प्रमाणपत्र (Blanket NOC) घेतले होते. सदर छजउ ची वैधता २०२० मध्ये संपुष्टात आलेली होती, त्यामुळे मध्यंतरीच्या कालावधीत पुनर्वसन क्षेत्रात बांधकाम परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदारांना वैयक्तिकरित्या भारतीय विमान प्राधीकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करावे लागत होते.

सिडको प्रशासनाने भारतीय विमान प्राधीकरणाशी पाठपुरावा करून सदर ना-हरकत प्रमाणपत्रांची ची वैधता वाढविण्यात यश प्राप्त केले आहे. एकूण सहा Blanket NOC पैकी सेक्टर -१ (वडघर), सेक्टर २४ (वहाळ १), सेक्टर २५ (वहाळ २), सेक्टर २५ - (वहाळ ३) व पुष्पक नगर या ५ क्षेत्रांना ना-हरकत प्रमाणपत्रांची वैधता .../२

> सिडकोच्या सातत्याने केलेल्या प्रयत्नांची दखल घेऊन व प्रकल्पबाधित नागरीकांच्या समस्या समजून घेऊन भारतीय विमानतळ प्राधिकरणातर्फे ६ पैकी ५ पॉकेट्ससाठी ना-हरकत प्रमाणपत्रे पुनर्प्रमाणीत करण्यात आली. या महत्वपूर्ण निर्णयामुळे विमानतळ पुनर्वसन व पुनःस्थापन क्षेत्राच्या विकासाला गती प्राप्त होईल यात शंका नाही.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## कामगार नेते महेंद्र घरत यांच्या न्यु मेरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेची यशस्वी घोडदौड

**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोनाच्या काळात अर्थव्यवस्था ढासळली असतांना. उदयोगधंधे सुद्धा सांभाळणे कठीण जात आहे. अशा परस्थितीत सुद्धा कामगार नेते महेंद्र घरत साहेब यांच्या न्यु मॅरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेच्या, व्यवस्थापन व कामगार यांची योग्य सांगड घालत कामगारांना स्वाभिमानाने जगता येईल असे प्रयत्न करत आहेत. कोरोनाचा कोणताही परिणाम संघटनेच्या कामकाजावर झालेला नाही. महेंद्र घरत साहेब यांच्या नेतृत्वाखाली दर वर्षी साधारणता संघटनेच्या माध्यमातून जवळ जवळ २० ते २२ करार होत असतात.

.../२



# पेठपाडा, रांजणपाडा आणि मुर्बीपाडा या पाड्यांचे गावठाण नगर भूमापन सर्वेक्षण करण्याचे आदेश

## आ.प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाकर जोशी यांच्या प्रयत्नांना यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तालुक्यातील ओवे विभागातील पेठपाडा, रांजणपाडा आणि मुर्बीपाडा या पाडयांचे गावठाण नगर भूमापन सर्व्हेक्षण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने संबधित विभागाला दिले असून आता या पाडयांना महसूल दर्जा प्राप्त होणार आहे. या कामी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे पनवेल तालुका संघटक प्रभाकर जोशी यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा कामी आला आहे.

ओवे या मूळ गावठाणाचे सर्वेक्षण झाले होते. मात्र या विभागातील पेठपाडा, रांजणपाडा आणि मुर्बीपाडा या पाडयांचे गावठाण नगर भूमापन सर्वेक्षण अद्याप करण्यात आले नव्हते. त्यामुळे प्रभाकर जोशी यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे या



संदर्भात मार्गदर्शन घेऊन रायगड जिल्हाधिकारी, भूमि अभिलेख, पनवेल महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे मागणी करून सतत पाठपुरावा केला.

त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाने ओवे विभागातील पेठपाडा, रांजणपाडा आणि मुर्बीपाडा या पाडयांचे गावठाण नगर भूमापन सर्वेक्षण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने भूमी अभिलेख जिल्हा अधिक्षक यांना दिले. आणि त्या अनुषंगाने भूमी अभिलेख जिल्हा अधिक्षक यांनी तात्काळ कार्यवाहीसाठी भूमी अभिलेख पनवेल उप अधिक्षक यांना आदेश दिले आहेत. या सर्वेक्षणामुळे या तिन्ही पाडयांना महसुली गावाचा दर्जा प्राप्त होणार असून येथील नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर व प्रभाकर जोशी यांना धन्यवाद देऊन त्यांचे आभार मानले.

## नागोठण्यात तरुणाची नैराश्येतून आत्महत्या

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे येथील खडकाळी भागात राहणारा तरुण वैभव महिपत काजारे (वय- २५) वर्षे याने राहत्या घरात नैराश्यातून गळफास घेत आत्महत्या केली.

या संदर्भात नागोठणे पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार वैभव हा खडक आळीतील चाळीत एका खोळीत भाड्याने राहत होता. वैभव यास कोणताही कामधंदा नसल्याने यामुळे आलेल्या नैराश्यातून घरात कोणीही नाही याचाच फायदा घेत तो राहत असलेल्या घरामधील छताला असलेल्या लाकडी कडीला साडीच्या साहय्याने त्याने गळफास घेऊन आत्महत्या केली.


सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

**सिडको उद्यान विभाग**

शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको लि.) च्या हद्दीतील खाली नमूद केल्याप्रमाणे मा.कार्यकारी अभियंता(ने.उ.रे.), सिडको लि., नवी मुंबई यांनी पायाभूत सुविधांच्या विकास कामात बाधित होणारी झाडे तोडण्यास रीतसर परवानगी मागितली आहे.

| अ.क्र. | झाडे तोडावयाचे ठिकाण | अर्जदाराचे नाव | बाधित होणारी झाडे |
|---|---|---|---|
| १. | खारकोपर ते उरण रेल्वे, नेरुळ उरण रेल्वे प्रकल्प (२रा टप्पा), चेनेज ८ कि.मी. ते २७ कि.मी. (सर्व्हे क्र.१३३,१६६,१६७, जासई, ता.उरण व सर्व्हे क्र. २७१,२७३,२८१ गव्हाण, ता.पनवेल,जि.रायगड.) | मा.कार्यकारी अभियंता(ने.उ.रे.), सिडको लि., ६वा मजला, रायगड भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई. | १०६ |
| | | एकूण | १०६ |

सदर पायाभूत सुविधाच्या विकास कामात बाधित होणारी झाडे तोडण्यास परवानगी देणे अगोदर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये हरकती मागविण्यात येत आहेत. तरी कोणाच्या काही हरकती असल्यास ७ दिवसांच्या आत उद्यान विभाग, सिडको लि., ८ वा मजला, रायगड भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे लेखी स्वरुपात देण्यात याव्यात. मुदतीत हरकत न आल्यास झाडे तोडण्यास वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
वृक्ष अधिकारी, सिडको लि.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३२७/२०२१-२२


पृष्ठ क्र.१ वरुन...

## कामगार नेते राजेश ठाकूर यांचे अपघाती निधन

मिळवून देण्यासाठी लढत राहिले. बीपीसीएल प्रमाणेच उरण परिसरातील कामगारांच्या संघटनेत ही ते सक्रिय होते. भेंडखळ गावातील तरुणांना न्याय मिळविण्यासाठी त्यांचे संघटन त्यांनी केले.हे काम करीत असताना त्यांच्यावर १९९३ ला प्राण घातक हल्ला झाला या हल्लयातून ते बाल बाल बचावले. त्यानंतर ही त्यांनी न डगमगता आपले चळवळीतील कार्य कायम ठेवले. ते शेवटच्या क्षणा पर्यन्त .सध्या भारत पेट्रोलियमचे खाजगीकरण केले जात आहे या खाजगीकरणाच्या विरोधात कामगारांना समजावून सांगून एकजूट करण्याचे काम ते करीत होते. कामगाराना बीपीसीएल बद्दल ईतम्बभूत माहिती देण्याचे काम ते करीत होते. पेट्रोलियम क्षेत्रातील माहिती असलेले कॉम्रेड राजेश हे एकमेव नेते होते.त्यांचा केंद्रीय पातळीवरील नेत्यांशी असलेला संपर्क हा दांडगा होता.

त्यांच्या पार्थिवावर उरण तालुक्यातील भेंडखळ या जन्मगावी काल शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे दोन मुलं व पत्नी असा परिवार आहे. यावेळी कामगार क्षेत्रातील नेते, व कामगार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जेएनपीटीचे कामगार विश्वस्त भूषण पाटील, कामगार नेते व क्रांतिकारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे रमेश ठाकूर, ॲड. प्रमोद ठाकूर, ॲड.विजय पाटील, काँग्रेस नेते राम भगत, बीपीसीएलचे कामगार नेते किरीट पाटील, एम.डी. ठाकूर, अनंत घरत, प्रविण पाटील, जयवंत पाटील यांनी श्रद्धांजली वाहिली.

## अंतिम धोरण नगरविकास विभाग लवकरच निश्चित करणार : ना.एकनाथ शिंदे

पुनर्विकासापासून वंचित राहिलेल्या इमारतींचा प्रश्न गेल्या काही वर्षापासून प्रलंबित आहे. या इमारतींची उंची वाढवायला तसेच इतर इमारतींप्रमाणे त्यांना एफएसआय आणि टीडीआरचे लाभ घेता येत नसल्याने त्यांचा पुनर्विकास रखडला आहे. या इमारतींचा पुनर्विकास करणे व्यावहारिक नसल्याचे कारण पुढे करून अनेक विकासकानी त्यांच्याकडे पाठ फिरवली आहे. मुंबईतील घाटकोपर, कुर्ला, सांताक्रूझ, अंधेरी, विलेपार्ले येथील अंदाजे १५ ते २० लाख लोक या इमारतीमध्ये रहात आहेत. त्यातील अनेक इमारती ६० ते ७० वर्ष जुन्या झाल्याने अत्यंत धोकादायक आणि मोडकळीस आल्या आहेत. त्यात अनेक नागरिक आपला जीव मुठीत धरून जगत आहेत. नगरविकास विभागाच्या माध्यमातून त्यांच्या पुनर्विकासाचे धोरण निश्चित करण्याची मागणी होत आहे. या विषयावर बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या समस्या नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यापुढे मांडल्या. या इमारतींच्या पुनर्विकासाचे धोरण निश्चित करताना सर्वसामान्य इमारतींना अधिकृत बिल्ट अप एरियाच्या आधारावर टीडीआर द्यावा आणि महापालिकेच्या रेकॉर्डमध्ये आहेत तेवढ्याच सदनिका बांधण्याची परवानगी मिळावी अशी मागणी करण्यात आली. हे शक्य नसल्यास सर्वसामान्य इमारतींना मिळतो तोच टीडीआर या इमारतींना देऊन विकासकांना पुनर्विकास व्यावहारिक होईल असे सूत्र तयार करावे अशी मागणी पुढे आली. त्यावर फनेल झोन बाहेरच्या इमारतींना मिळणारे फायदे या इमारतींना देऊन त्यांचा पुनर्विकास व्यवहार्य बनवणे गरजेचे असल्याचे मत श्री. शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच अनेक वर्षे हे रहिवासी पुनर्विकासापासून वंचित असल्याने त्यांना दिलासा देणे ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे. त्यामुळे याबाबत सर्वंकष धोरण तयार करून लवकरात लवकर ते सादर करावे अशी सूचना त्यांनी नगरविकास विभागाला केली. तसेच या इमारतींच्या पुनर्विकासाचे धोरण निश्चित झाल्यानंतर निर्णयात सुस्पष्टता रहावी यासाठी नगरविकास आणि मुंबई महानगरपालिका यांची एकत्रित बैठक घेऊन याबाबत अंतिम निर्णय घेण्याची तयारीही त्यांनी दर्शवली.

## भूखंडांच्या विकास परवानगी प्रक्रीयेला गती

जानेवारी ते मार्च २०२४ पर्यंत वाढवून मिळाली आहे. शिवाय R-1 ते R-5 (वडघर १) या क्षेत्राच्या ना-हरकत प्रमाणपत्राची वैधता वाढवून मिळण्यासाठी पाठपुरावा सुरु असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर मंजुरी लवकरच अपेक्षित आहे.

ऑक्टोबर- नोव्हेंबर २०२१ मध्ये सदर वैधता वाढवून मिळाल्यानंतर सिडकोतर्फे पुनर्वसन व पुनःस्थापन क्षेत्रातील ७ प्रस्तावांना बांधकाम परवानगी देण्यात आली आहे तसेच ३४ प्रस्तावांमध्ये भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०२.१२..२०२० रोजीच्या अधिसूचना क्र. TPS-१८१८/CR-२३८/१८/Sec ३७(१AA)/UD-१३, अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (णऊउझठ) सिडको क्षेत्रांकरीता लागु करण्यात आली आहे. नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाच्या पुनर्वसन धोरणान्वये वितरीत करण्यात आलेले बहुतांशी भूखंड ४५० चौ.मी. क्षेत्रफळाच्या आतील असल्याने रो हाउस व सेमी डिटॅच (अर्ध अलिप्त) प्रकारच्या विकासासाठी पूर्वीच्या नियमावलीनुसार सदर भूखंडांवर एक बाजू किंवा दोन्ही बाजू सामाईक ठेवून परवानगी मिळावी यासाठी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांनी नगर विकास विभागास विनंती केली होती. सदर विनंतीस मंजुरी मिळाली असल्याने प्रकल्पबाधितांसाठी वाटप केलेल्या ४५० चौ.मी पर्यंत क्षेत्राच्या भूखंडामध्ये एक बाजू किंवा दोन्ही बाजू सामाईक ठेवून १३ मी. उंचीच्या मर्यादेत १.५ FSI सह (पार्किंग साठी च्या STILT मजल्याची उंची वगळता) परवानगी देण्यात येत आहे. शिवाय, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या तरतुदींनुसार सिडकोच्या वसाहत विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त असल्यास वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकासह विकास परवानगी देण्यात येत आहे. सिडकोच्या वरील परिश्रमांमुळे पुनर्वसन विभागातील भूखंडांवर जलदरीत्या विकास परवानगी मिळण्याचा मार्ग सुखकर झालेला आहे. तथापि, सिडकोने विकास परवानगी देणे बंद केले आहे अशा प्रकारच्या अफवा पसरविल्या जात आहेत. तरी, सदर अफवांना बळी न पडता आवश्यक त्या कागदपत्रांसह बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा असे सिडकोतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

## महेंद्र घरत यांच्या न्यु मॅरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेची यशस्वी घोडदौड

त्याप्रमाणे जानेवारी २०२१ पासुनचा हा १२ करार भेंडखळ येथील हिंद टर्मिनल मधील मे. पिन्याकल मारिन सर्व्हिस मधील कामगारांना तब्बल ७ हजार ५०० रुपयांचा भरघोस पगारवाढ करण्यात आली.हा करार तीन वर्षाचाअसून, यामध्ये कामगारांना पहिल्या वर्षी ६ हजार , दुसऱ्या व तिसऱ्या वर्षासाठी प्रत्येकी ७५० अशा प्रकारे करण्यात आला. त्याच प्रमाणे प्रत्येक कामगारास दरवर्षी १४ टक्के बोनस देण्यात येईल तसेच प्रत्येक कामगारांना ३ तीन लाख रुपयांचा मेडिक्लेम सुद्धा देण्यात आला आहे. त्याप्रमाणे प्रत्येक कामगारांस ऐरिअसच्या रूपाने १ लाख ते सव्वा लाख रुपये मिळतील अश्या प्रकारचा ऐतिहासिक करार काल कामगार नेते. महेंद्र घरत यांच्या कार्यालयात करण्यात आला. यावेळी संघटनेच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष. महेंद्र घरत , संघटनेचे सरचिटणीस.वैभव पाटील,संघटनेचे उपाध्यक्ष. श्री किरिट पाटील संघटनेचे संघटक योगेश रसाळ, रायगड जिल्हा काँग्रेस चे उपाध्यक्ष श्री मिलिंद पाडगावकर, महाराष्ट्र फिशर मॅन संघटनेचे उपाध्यक्ष श्री.मार्तंड नाखवा. कंपनी व्यवस्थापनातर्फे. संतोष जैन डायरेक्टर कामगारांनच्या वतीने लंकेश ठाकूर, प्रांजल भोईर, जयेश कडू, देवेंद्र ठाकूर,हरेश ठाकूर, मनोज पाटील, सर्वेश पाटील, रविंद्र पाटील संदेश भोईर, विशाल ठाकूर, मनोज ठाकूर यावेळी उपस्थित होते. यावेळी सर्व कामगारांनी कामगारनेते व रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांचे आभार मानले.

ॲड.सुजाता पाटील

### जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात
चौ.अर्ज क्र.१०५०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२२

श्री.विजय आनंद
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
एफ १७०३, पटेल हेरिटेज, सेक्टर ७,
खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१० ... अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका ... सामनेवाले

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.श्री.नवल किशोर सिन्हा यांचा मृत्यू दि.०१/०७/२०२० रोजी खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या वडिलांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

कै.श्री.नवल किशोर सिन्हा यांचा मृत्यू वरील नमूद ठिकाणी झालेला आहे. त्याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.०३/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/ क.लिपीक प्र.व.न्या.पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक प्र.व.न्या.पनवेल

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस याा नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशिल सुचेता सुधाकर शिरोडकर, वय सज्ञान, व्यवसाय : पोलीस, पत्ता : बी ३०२, मारुती इनक्लेव सी एच एस, प्लॉट नं.६८, सेक्टर २०, खारघर, रायगड ४१०२१० यांच्या नावे खालील वर्णन केलेल्या सदनिकेबाबतची संपूर्ण मुळ कागदपत्र फाईल माझे अशिलांनी खारघर पोलीस स्टेशनमध्ये ठेवले होते. पोलीस स्टेशनमध्ये दि.२६ जून २०१९ रोजी सकाळी ९ वाजून ४५ मि. अकस्मात आग लागल्याने त्यामध्ये वर नमूद केलेल्या सदनिकेबाबतची संपूर्ण मुळ कागदपत्र फाईल अर्धवट जळालेली आहे. याबाबत खारघर पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात जळीत रजिस्टर नं.४/१९ मध्ये नोंद करण्यात आलेली आहे. सदर मिळकतीचे वर्णन

**मालमत्तेचा तपशिल**
**सदनिका क्र.३०२, तिसरा मजला, बी विंग,**
**मारुती एन्क्लेव्ह, प्लॉट क्र.२०, खारघर,**
**ता.पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१०**

वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील कोणास काही हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत दाखल करावे. तसे न झाल्यास ते कागदपत्र गहाळ समजण्यात येईल किंवा सदर बाबत कुणाची हरकत नाही व त्या कागदपत्रा संदर्भात कोणाकडून बेकायदेशीर काम झाल्यास त्यासाठी माझे अशिल जबाबदार नसतील याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑ.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, से.१२ खारघर**
**मो.नं.८८७९४१६४८३**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : तुरमाळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक आनंद आंबाजी माळी, रा.मौजे : तुरमाळे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिश्श्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तुरमाळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्रं. | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ९८ | २ | जिरायत ००.५७.०० पो.ख. ०.०२.०० एकूण क्षेत्र ००.५९.०० पैकी ००.१५.०० विक्री क्षेत्र | ११.१२ |

**एकूण क्षेत्र ००.५९.०० गुंठे पैकी श्री.आनंद आंबाजी माळी यांचे ००.१५.०० गुंठे क्षेत्राचे विक्रीबाबत जाहीर नोटीस**

तरी वर नमूद जमिनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबत जमीन मालक श्री.आनंद आंबाजी माळी, यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/१२/२०२१

सही/-
**श्री.समाधान आबासाहेब काशिद**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं.६, तळमजला, श्री.बालाजी कृपा**
**सोसायटी, भूखंड क्रं.२८, सेक्टर नं.२२,**
**कामोठे, नवी मुंबई ४१०२०९**
**मो.नं.९०९६३९९०२०**

ॲड.पी.एस.देशमुख
अर्जदारतर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.१२५६/२०२१
ने.ता.०७/०१/२०२२

सौ.लता समाधान चव्हाण
वय : ३२ वर्षे, धंदा : शेती
रा.एकता अपार्टमेंट बिल्डींग नं.सी ०५-११
रुम नं.३/४, सेक्टर ०३, सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई, कोकण भवन, ठाणे ४००६१४ ... अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत वहाळ ... सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार ह्यांचा मुलगा कु.शाश्वत समाधान चव्हाण यांचा जन्म दि.२०/१०/२०२० रोजी फिनीक्स हॉस्पिटल उलवे, ता.पनवेल येथे जन्म झाला असल्याने अर्जदाराने या न्यायालयात त्याच्या जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायालयामध्ये अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू कु.शाश्वत समाधान चव्हाण ह्या वर नमूद तारखेस व ठिकाणी जन्म झालेला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू व्यक्तीचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटी आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२/१२/२०२१ रोजी दिली.

सही/ क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

राव साहेब
अर्जदारांतर्फे वकील
ॲड.श्री.अमोल पालकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६५५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) श्रीमती.सीमा सुधीर रेनापुरकर
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ब्लॉक नं.२१, औसा रोड, न्यू आदर्श कॉलनी,
टिळकनगर, लातूर, महाराष्ट्र-४१३५३१
२) श्रीमती.सुचेता प्रमोद कामेरकर
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.५०४-बी, सिटी एव्हेन्यू को.ऑप.हौ.सोसा.,
प्लॉट नं.१०१, शबरी हॉटेल जवळ, सेक्टर-१/एस,
नवीन पनवेल (पूर्व), ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ ... अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी वंदना यशवंत बल्लाळ या दि.०१/१०/२०१४ रोजी मरण पावल्या आहेत. सदर मयत वंदना यशवंत बल्लाळ यांच्या मालकीची पुढीलप्रमाणे वर्णनाची सदनिकेची मिळकत त्यांचे मृत्यूपश्चात आजमितीसही त्यांचेच नावे नोंदविलेली आहे :-

**सदनिकेचे वर्णन**
**मौजे : नवीन पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील सिडको लिमिटेड यांच्या हद्दीतील, सेक्टर-४ मधील प्लॉट नं.२२८ या भूखंडावरील 'रायगड अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित' या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र.१२, क्षेत्र ४०० चौ.फुट (बिल्टअप), ही सदनिका**

आणि ज्याअर्थी वर नमूद केलेल्या सदनिकेची मिळकत मयत वंदना यशवंत बल्लाळ यांचे मृत्यूपश्चात सदर अर्जदार यांचे नावे होण्याकरिता सदर अर्जदार या सदर मयत वंदना यशवंत बल्लाळ यांच्या कायदेशीर वारस आहेत असा ठराव होवून सदर अर्जदारांचे लाभांत वारस दाखला मिळणेकरिता सदर अर्जदारांनी या मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदारांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या ना.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.०३ माहे १२ सन २०२१ रोजी माझ्या सहीने व या मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/ क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

राव साहेब
अर्जदाराचे वकील
ॲड.संगम सावंत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१३३३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) कु.नरेंद्र भरत भोईर
वय : १८ वर्षे, धंदा : शिक्षण
२) कु.मानसी भरत भोईर
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
दोघे रा.४७, शिवकर रोड, उसर्ली खुर्द, ओएनजीसी
कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२२१
३) सौ.रुचिका विजय मढवी
वय : २३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.भिंगारी, घर नं.११८, एमएसईडीसीएल ऑफिसजवळ,
भिंगारी, पो.ओएनजीसी, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांचे वडील कै.भरत गोविंद भोईर हे दि.११/०४/२०२१ रोजी हिरानंदानी फोर्टीस हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार यांची आई कै.रत्नमाला भरत भोईर ह्या दि.१२/०६/२०१७ रोजी व कै.भरत गोविंद भोईर यांची आई व अर्जदार यांची आजी कै.शनिवारी गोविंद भोईर या दि.११/०८/२००४ रोजी मौजे : उसर्ली खुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथील राहत्या घरी मयत झाली आहे.

कै.भरत गोविंद भोईर यांचे नांवे खालील वर्णाच्या चल मिळकती आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| | |
|---|---|
| अ | मारुती सुझुकी इंडिया लि. या कंपनीची WAGONR LXI CNG ही कार चेसिस नं.MA3JMT31SMC449482 |
| ब | एल.आय.सी. जीवन सरल पॉलिसी नं.९२४२७९२६१ |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेल्या मिळकतींच्या अनुषंगाने सक्सेशन दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात दाखल केला आहे.

वरील अर्जदार कै.भरत गोविंद भोईर यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा सक्सेशन दाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.भरत गोविंद भोईर यांचे सक्सेशन प्रमाणपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना सक्सेशन प्रमाणपत्र मंजूर करेल.

आज दि.०३/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/ क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक १११(३)] गुरुवार, सप्टेंबर ९, २०२१/भाद्र १८, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २५६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई 400 032, दिनांक 9 सप्टेंबर 2021.

**अधिसूचना**

क्रमांक खाक्षेस-2021/प्र.क्र.115/रस्ते-8.— ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित हे महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (1955 चा 55) याच्या कलम 4 च्या परंतुकाच्या तरतुदीं अनुसार (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" म्हणून करण्यात आला आहे) यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्ग क्षमतावाढ प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य महामार्ग (विशेष) क्र. 3(A) यासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा करण्यात आला आहे) महामार्ग प्राधिकरण आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित महामार्ग प्राधिकरणाने उक्त महामार्गाच्या संदर्भात महामार्ग प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र शासनाला विनंती केली आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत उल्लेखित जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी आवश्यक एक सार्वजनिक प्रयोजन म्हणून उक्त अधिनियमाच्या तरतुदीं अंतर्गत उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, महाराष्ट्र शासनाकडून अधिग्रहित करण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे की, एका सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन ही उक्त महामार्गाचे किंवा त्याच्या काही भागाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठी आवश्यक आहे आणि म्हणून उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी, पूर्वोक्त प्रयोजनांकरिता, उक्त जमीन संपादित करणे शासनास इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, 1955 (1955 चा 55) याच्या कलम 15 च्या पोट- कलम (2) व (3) व कलम 17 द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे,—

(एक) उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन करणे यांसाठी उक्त महामार्ग प्राधिकरणासाठी उक्त जमिनीचे संपादन करण्याची घोषणा करीत आहे;

(दोन) विनिर्दिष्ट करीत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 7 अंतर्गत निर्गमित केलेल्या अधिसूचनेला प्रतिसाद म्हणून ज्यांच्या हरकती व सूचना यापूर्वीच विचारात घेतल्या आहेत किंवा महामार्ग प्राधिकरणाकडून सुनावणी झाली आहे अशा व्यक्तींखेरीज उक्त जमिनीशी हितसंबंधित कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत संबंधित भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कर्जत, जिल्हा रायगड यांच्याकडे उक्त महामार्गाचे बांधकाम, देखभाल, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यासाठीच्या प्रयोजनांसाठी उक्त जमिनीच्या वापराबाबत लेखी व त्याच्या कारणांसह आक्षेप घेऊ शकते.

**अनुसूची**

**संपादित करावयासाठी उद्देशित असलेल्या जमिनीचे वर्णन**

**तालुका : खालापूर,** **जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | गाव | भूमापन क्रमांक / गट क्रमांक | क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | सावरोली | 83 | 0.4110 |
| 2 | सावरोली | 84 | 0.0010 |
| 3 | सावरोली | 36 | 0.2570 |
| 4 | सावरोली | 25 | 0.0690 |
| 5 | सावरोली | 26 | 0.0210 |
| 6 | सावरोली | 38 | 1.8030 |
| 7 | सावरोली | 78 | 0.0880 |
| 8 | सावरोली | 115 | 0.0560 |
| 9 | सावरोली | 114 | 0.3480 |
| 10 | सावरोली | 32 | 0.2170 |
| 11 | सावरोली | 34 | 0.0580 |
| 12 | सावरोली | 94 | 0.1510 |
| 13 | सावरोली | 93 | 0.0890 |
| 14 | सावरोली | 33 | 0.1010 |
| 15 | दहिवली तर्फे बोरेटी | 34 | 0.7070 |
| 16 | दहिवली तर्फे बोरेटी | 33 | 0.0070 |
| 17 | दहिवली तर्फे बोरेटी | 32 | 0.0200 |
| 18 | दहिवली तर्फे बोरेटी | 29 | 0.0010 |
| 19 | दहिवली तर्फे बोरेटी | 30 | 0.9780 |
| 20 | दहिवली तर्फे बोरेटी | 31 | 0.9240 |
| 21 | निफाण | 24 | 0.1250 |
| 22 | निफाण | 25 | 0.0140 |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ए. बी. गायकवाड,**
शासनाचे सचिव.

**PUBLIC WORKS DEPARTMENT**
Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 9th September 2021

*NOTIFICATION*

No. PPP-2021/CR-115/Road-8.- Whereas, the Maharashtra State Road Development Corporation Limited is the Highway Authority for the State Highway (Special) No. 3(A) to be known as the Capacity Augmentation Project of Yashwantrao Chavan Expressway (hereinafter referred to as "the said Highway") as per the provisions of the proviso to section 4 of the Maharashtra Highways Act (LV of 1955) (hereinafter referred to as "the said Act")

And whereas, the Maharashtra State Road Development Corporation Limited, being the Highway Authority, in respect of the said Highway, has requested the Government of Maharashtra that, the land mentioned in the Schedule appended hereto (hereinafter referred to as "the said land"), required by it for the building, maintenance, management or operation of the said Highway, being for the public purpose, be acquired by the Government of Maharashtra for the said Highway Authority under the provisions of the said Act;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that, for the public purpose, said land is required for the building, maintenance, management or operation of the said Highway or part thereof and therefore considers it expedient to acquire the said land for the aforsaid purposes for the said Highway Authority;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(2)* and *(3)* of section 15 read with section 17 of the Maharashtra Highways Act (LV of 1955), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby,—

*(i)* declares its intention to acquire the said land for the said Highway Authority for the building, maintenance, management or operation of the said Highway;

*(ii)* specifies that any person interested in the said land, other than the persons whose objections or suggestions have already been considered or heard by the Highway Authority in response to the notification issued under section 7 of the said Act, may, within twenty-one days from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette*, object to the use of the said land for the purposes of the building, maintenance, management or operation of the said Highway, in writing and stating the grounds thereof, to the Sub-Divisional officer, Karjat, District Raigad, being the concerned Land Acquisition Officer.

*Schedule*

**Description of land intended to be acquired**

Taluka Khalapur, District Raigad

| Sr. No. | Village | Survey Number / Gat Number | Area (Hectare Are) |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Savroli | 83 | 0.4110 |
| 2 | Savroli | 84 | 0.0010 |
| 3 | Savroli | 36 | 0.2570 |
| 4 | Savroli | 25 | 0.0690 |
| 5 | Savroli | 26 | 0.0210 |
| 6 | Savroli | 38 | 1.8030 |
| 7 | Savroli | 78 | 0.0880 |
| 8 | Savroli | 115 | 0.0560 |
| 9 | Savroli | 114 | 0.3480 |
| 10 | Savroli | 32 | 0.2170 |
| 11 | Savroli | 34 | 0.0580 |
| 12 | Savroli | 94 | 0.1510 |
| 13 | Savroli | 93 | 0.0890 |
| 14 | Savroli | 33 | 0.1010 |
| 15 | Dahivali Tarfe Boreti | 34 | 0.7070 |
| 16 | Dahivali Tarfe Boreti | 33 | 0.0070 |
| 17 | Dahivali Tarfe Boreti | 32 | 0.0200 |
| 18 | Dahivali Tarfe Boreti | 29 | 0.0010 |
| 19 | Dahivali Tarfe Boreti | 30 | 0.9780 |
| 20 | Dahivali Tarfe Boreti | 31 | 0.9240 |
| 21 | Niphan | 24 | 0.1250 |
| 22 | Niphan | 25 | 0.0140 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,


A. B. GAIKWAD,
Secretary to Government.

### विविध जातींच्या असंख्य सापांना जिवनदान देणारा पेणचा सर्प मित्र योगेंद्र वीरकर

# सर्प मित्रांना राज्य शासनाने सुरक्षाकवच द्यावे : यशवंत घासे

**दै.रायगड नगरी । पेण**

जंगलावर नागरिकांनी अतिक्रमण सुरू केले असून त्यामुळे नागरी वस्तीत साप व वन्यजीव घुसण्याचे प्रमाण सध्या वाढले आहे. परिसरात सर्प दंश केल्याचं प्रमाण ही वाढले आहे. मात्र अनेक वर्षांपासून पेण शहरासह तालुक्यात असणा–या विविध जातींच्या असंख्य सापांना पकडून नागरीवस्ती पासून दूर जंगलात सुरक्षित स्थळी सोडून त्यांना नवजीवन देणारा पेण शहरातील साहसी व धाडसी तरुण योगेंद्र राजेंद्र वीरकर यांच्याकडे पाहिले जाते.



भुतलावरील अनेक प्राणी, जीवजंतू आपली भुक भागविण्यासाठी शिकार शोधत असतात त्यात सरपटणारे साप हे गावांमध्ये, वाडी वस्तीवर किंवा रस्त्यांवर आपली शिकार शोधण्यासाठी बाहेर पडत असतात. त्यात नाग, अजगर, धामण, घोणस, सुर्यकांडर, धुळनागीन, मण्यार, दिवड, अजगर यासह अनेक विषारी, बिनविषारी जातीचे प्रजातीचे आणि विविध रंगांचे आकारांचे साप दिसतात. मात्र अचानक साप समोर आल्याने अनेकांची धावपळ होऊन जीव ही गमवावा लागला आहे. मात्र याच सर्पमित्रांना त्याची माहिती मिळाली तर आपल्या हातातील सर्व कामे बाजूला ठेवून तसेच कितीही दुर असले तरी त्या सापाला जिवदान देण्यासाठी आपल्या साहसापोटी सर्पमित्र दाखल होऊन त्याचा जीव वाचवितात. परंतु तो साप विषारी की बिनविषारी याची खात्री न बाळगता त्याला पकडणे आणि सुरक्षित स्थळी सोडणे हाच विचार त्यांच्या मनात असल्याने हातात मिळेल ते साहित्य घेऊन हे सर्पमित्र भल्यामोठ्या सापांना पकडून त्यांना जिवदान देतात.

त्यातीलच पेण मधील सर्पमित्र योगेंद्र वीरकर यांनी मागच्या अनेक वर्षात विविध जातींचे सर्प पकडून त्यांना नागरी वस्ती पासून दुर अशा जंगलातील सुरक्षित ठिकाणी सोडले आहेत. पेण तालुक्यात योगेंद्र बरोबरच अनेक तरुण सर्पमित्र आपल्या धाडसी कलेने सापांना जिवदान देत असतात. आपल्या आजूबाजूला जर सर्प आढळला तर त्याला न मारता योगेंद्र ला ९८५०४२१२४३ या नंबर वर संपर्क करा.

महाराष्ट्रातील अनेक सर्प मित्र आपल्या जिवाची पर्वा न करता सापाला कसे जिवदान देता येईल यासाठी प्रयत्न करत असतात. स्वतःच्या जीव–ाचा आटापिटा करून त्याला पकडतात. अश्यावेळी अनेक सर्प मित्रांना आपले प्राणही गमवावे लागले आहे. त्यामुळे शासनाने अशा सर्वमित्रांचा सर्वेक्षण करून त्यांना सुरक्षा कवच देण्यात यावा अशी मागणी प्राणी मित्र तथा पेणचे समाजसेवक यशवंत घासे यांनी केली आहे.

# संक्षिप्त...

## सलमान खानची मोटार सायकल गेली चोरीस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातून सलमान खान या तरुणाची मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

तळोजा औद्योगिक वसाहत परिसरामध्ये एका कंपनीमध्ये काम करणारा सलमान पेसकार खान या तरुणाची मोटार सायकल कंपनीच्या गेटवर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर मोटार सायकल चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिवस विविध कार्यक्रमाने उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे पं.समिती शिक्षण विभाग यांच्या वतीने श्रमिक विद्यालय चिल्हे येथे आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिवस ( ता.३ डिसें.) विविध प्रकारच्या कार्यक्रमाने मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला. रोहे पं.समितीचे गट शिक्षणाधिकारी सादूराम बांगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी विस्ताराधिकारी रत्नाकर कनोजे,मुख्याध्यापक दीपक जगताप, जेष्ठ शिक्षक नरेंद्र माळी,निळकंठ कदम,प्रसाद साळवी,विनायक चितळकर,अनिल सुटे,लता भोईर,फाटे,विजया गुजर,रंजना पाटील, कल्पना नागरे,भानुदास आमले,उस्ताद सय्यद उसतुरे आदींसह पालकवर्ग उपस्थित होते. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी या उद्देशाने शासन स्तरावर विविध प्रकारच्या उपक्रम राबविले जात आहेत. तर श्रमिक विद्यालय चिल्हे येथे आयोजित करण्यात आलेल्या या दिवसानिमित्त विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम, विविध मनोरंजक खेळ,निबंध व चित्रकला स्पर्धा आदी कार्यक्रमही संपन्न करण्यात आले.तर विविध उपक्रमात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.यावेळी निळकंठ कदम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच ग.शिक्षणाधिकारी सादूराम बांगारे यांनी मनोगत व्यक्त करताना जीवन जगत असताना आपण कोणीही स्वतःला कमी लेखू नये.तर आपल्यातील असलेल्या उणिवांवर मात करून आत्मविश्वासाने आपण पुढे गेलो तर जीवनात नक्कीच यश मिळते असे शेवटी सांगितले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार विजया गुजर यांनी व्यक्त केले.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# खोपोली नगर परिषद कार्यालयासमोरील खोदलेले गटार देतेय अपघाताला आमंत्रण

## सुरक्षा उपाययोजनांकडे मुख्याधिकारी यांचे वारंवार लक्ष वेधूनही 'ये रे माझ्या मागल्या

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगर परिषद कार्यालयासमोर वासरंग, लौजी रस्त्यालगत गेल्या काही दिवसांपासून नवीन गटाराचे काम सुरु असून जेसीबी मशीनद्वारे चार ते पाच फूट खोलीचे गटार खोदून सिमेंट कॉन्क्रीटचे गटार बनविण्यात येत आहे. रस्त्याच्या अगदी किनाऱ्यावर गटाराचे खोदकाम होत आहे. काम करीत असतांना या रस्त्यावर चेतावनी फलक किंवा प्लास्टिकचे बॅरिगेट सुरक्षा हेतूने लावण्यात आलेले नाहीत. सध्या सळई (आसारी) चे काम सुरू आहे. परप्रांतीय मजूर या ठिकाणी काम करीत आहेत, पण सुरक्षेची काळजी न घेत हे काम केले जात आहे, जणू खोपोली नगर परिषद प्रशासन व ठेकेदार कुणाचा तरी बळी गटारीला दिला जावा, याच मानसिकतेत पोहचल्याचे चित्र सध्या या ठिकाणी दिसून येत आहे.



खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी पदभार घेतल्यापासून या गटारीच्या कामाच्या सुरक्षेबाबत वारंवार त्यांचे लक्ष वेधण्यात आले. दोन दिवसांपूर्वी (दि. ३० नोव्हेंबर) रायगड संघर्ष समितीसोबत तहसिलदार अय्युब तांबोळी, खालापूर पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत सुध्दा या गटारींच्या सुरक्षेचा मुद्दा मांडण्यात आला होता, पण ते गंभीरतेने घेण्यात आले नाही. कुणाचा तरी बळी गेल्यावर खोपोली नगर परिषद प्रशासनाला जाग येईल का? असा संतप्त सवाल रायगड संघर्ष समिती संयोजक जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ यांनी 'पत्रकराशी ' बोलतांना व्यक्त केला.

खोपोली नगर परिषदेच्या इमारतीला लागूनच असलेल्या या गटारीजवळून नगराध्यक्षांसह नगरसेवक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, मुख्याधिकारी व शासकीय अधिकारी आवागमन करीत असतात. यासोबतच नगरपरिषद कार्यालय, मस्को कंपनी, लौजी रेल्वे स्टेशन, शाळा व भाजी मार्केट, बाजारपेठ, बस स्टॅन्ड असल्याने नागरिक या रस्त्यांहून ये-जा करीत असून नेहमी या मार्गावर वाहनांची वर्दळ सुरू असते. त्यामुळे रस्त्यांवर सुरु असलेले काम हे बेजबाबदारपणे करण्यात आल्याने रात्री - बेरात्री वळणावर एखादे वाहन कोसळून अपघात झाले व अपघातात जीवितहानी झाली तर याचे जबाबदार कोण राहणार? असा सवाल प्रवासी वाहनचालकांमधून देखिल उपस्थित केला जात आहे. नगर परिषदेचे अधिकारी ठेकेदारांकडून अशा कामांवर जबाबदारीने लक्ष देऊन सुरक्षेचा पालन करीत कामे का करून घेतली जात नाही? प्रशासनाला जाग येणार तरी कधी? सुरक्षा नियमांचे पालन करून कामे होणार तरी कधी? असा संताप सवाल खोपोलीकरांकडून उपस्थित होत आहे.

आज दि. २ डिसेंबर शुक्रवार रोजी खोपोली नगर परिषद मुख्य गेट लगत असलेल्या गटारीत स्लब टाकण्याच्या दृष्टीने सळई बांधणीचे काम तीन मजूर करीत आहेत. दोन मजूर खड्ड्यात उतरून काम करीत होते, तर एक मजूर सळ्या उचलून त्यांना देत होता, परंतु या सळ्या उचलतांना कोणत्याही सुरक्षा नियमांची काळजी घेतली जात नव्हती. ऐवढेच नव्हे तर या कामगारांना मराठी समजत नसल्याने त्यांना तसे सांगूनही उमजले नाही. काही महिन्यांपूर्वी मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी सदर ठेकेदाराला 'नोटीस' बजावण्याचे आदेश गायकवाड यांना दिले होते. मग ऐवढ्या दिवसांत नेमके पाणी कुठे मुरले? की नोटीस तर निघालीच नाही, पण नियमांची मोडतोड करून सुरू असलेले काम बेधडक सुरू आहे. खोपोली शहरात खरंच घटनेचे राज्य आहे, की मोगलाई आहे? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

## आग्रा घराण्याचे गायक पंडित उमेश चौधरी यांची रंगणार शास्त्रीय संगीत मैफिल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक, रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय संगीत गायनाची मैफिल रोटरी क्लब ऑफ वाई च्या वतीने ०५ डिसेंबर रोजी वाई (सातारा) येथे आयोजित करण्यात आली आहे.

कोरोनाच्या संकटातून जवळपास दोन वर्षांनंतर पुन्हा एकदा गायक व श्रोता एकत्रित येण्यास प्रारंभ झाला आहे. आणि हि कलेची संस्कृती वृंध्दीगत करण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन महत्वाचे आहे, त्या अनुषंगाने पंडित सदाशिव पवार स्मृतिदिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ वाई यांच्यावतीने रायगड जिल्ह्यातील शास्त्रीय संगीताची शान असलेले पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम लोकमान्य टिळक स्मारक संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.



त्यांना तबल्यावर निषाद पवार, हार्मोनियमवर सुरेश फडतरे, पखवाजावर किरण भोईर तर गायन साथ मंगेश चौधरी आणि अक्षय चौधरी यांची असणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रीक्ट ३१३२ गव्हर्नर स्वाती हेरकळ तर विशेष उपस्थिती उस्ताद अजीम खान यांची असणार आहे.

पंडित उमेश चौधरी यांनी शिक्षणात पदवीधर, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची 'विशारद' पदवी त्यांनी प्राप्त केली आहे. दूरदर्शन, आकाशवाणी तसेच विविध कार्यक्रमात त्यांनी आपल्या सुरमयी कलेने रसिकांना मंत्रमुग्ध केले आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सुरु असलेल्या मासिक संगीत सभेच्या माध्यमातून पनवेल तालुका सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष म्हणून त्यांनी शेकडो कलाकारांना व्यासपीठ मिळवून दिले आहे. देशभरात विविध ठिकाणी संगीताचे कार्य करत असताना त्यांनी आपल्या कलेची छाप सोडली आहे, त्यामुळे त्यांचा भीमसेन जोशी गानगंधर्व, रायगड भूषण, रायगड गौरव असे आणि बरेच पुरस्काराने गौरव झाला आहे. त्यांच्या गायनाने संगीत मैफिल प्रफुल्लीत होत असते म्हणून वाई रोटरी क्लबने या संगीत मैफिलीचे आयोजन केले आहे.

## फुस लावून गेलेल्या अल्पवयीन मुलीला पनवेल तालुका पोलिसांनी घेतले ताब्यात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने फुस लावून अपहरण केल्याप्रकरणी तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यानुसार विशेष पथकाने सदर मुलीचा तांत्रिक तपासाच्या आधारे तपास काढून प्रयागराज उत्तरप्रदेश येथून ताब्यात घेतले आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे या संदर्भात सदर मुलीच्या कुटुंबियांनी तक्रार दाखल करताच वपोनि रवींद्र दौंडकर व गुन्हे शाखेचे पो.नि.खेडकर आदींच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत शिर्के व पोलीस नाईक हिंदूराव कदम व महिला पोलीस शिपाई समिक्षा घरत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास करून यातील अपहरीत अल्पवयीन मुलगी हि ग्राम-बडहा तालुका-कौन्धीयार जिल्हा-प्रयागराज, उत्तरप्रदेश राज्य येथे असल्याचे तपासात निष्पन्न केले व वरिष्ठांच्या पूर्व परवानगीने व मार्गदर्शनाने पोलीस पथक हे सदर ठिकाणी रवाना झाले असता त्यांना सदर अल्पवयीन मुलगी ही मिळून आली. सदर मुलीस ताब्यात घेवून पनवेल येथे परत आणण्यात आणून तिच्या कुटुंबियांच्या स्वाधीन करण्यात आले.

## म्हसळा येथे ४ डिसेंबर रोजी शेतकरी कामगार पक्षाचा जाहीर मेळावा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्ह्यात होणाऱ्या आगामी रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायती व ग्रामपंचायती इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याच्या हेतूने शनिवारी दिनांक ४ डिसेंबर रोजी सकाळी १०.०० वाजता आगरी समाज हॉल येथे शेतकरी कामगार पक्ष कार्यकर्ता मेळावा आयोजीत केला आहे.

या मेळाव्यात शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार भाई जयंत पाटील, माजी आमदार पंडीत पाटील, जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटिल आणि इतर मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे. एकेकाळी म्हसळा तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात होती. जिल्हा परिषद सदस्य तसेच अनेक ग्रामपंचायतमध्ये शेकापचे सरपंच निवडून आले होते. मागील झालेल्या जिल्हा परिषद, विधानसभा, आणि लोकसभा निवडणुकीत शेकापची राष्ट्रवादी सोबत आघाडी होती.

या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या उमेदवाराला जिंकून देण्यासाठी शेकापने पूर्ण ताकद लावली होती. परंतु आगामी होणाऱ्या म्हसळा नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती च्या होणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादी आणी शेकाप एकत्र दिसणार नाही असे चित्र सध्या आहे. येणाऱ्या निवडणुकीत शेकाप शिवसेना, काँग्रेस बरोबर युती करते का एकला चलो चा नारा देणार. या बाबतीत आमदार जयंत पाटील काय बोलणार याकडे साऱ्या तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## कोविड-१९ अनुरूप वर्तनाविषयी माथेरान मुख्याधिकारी यांनी सुधारित आदेश केले जारी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

देशात कोरोनाची वाढती भीती लक्षात घेता ओमायक्रॉन या विषाणूच्या नव्या व्हेरिएंटचे आव्हान चिंता वाढविणारे आहे. ओमायक्रॉन या व्हेरिएंटची घातकता लक्षात घेता कोणत्याही परिस्थितीत संसर्ग वाढता कामा नये, यासाठी एकूण परिस्थिती पाहता माथेरानच्या मुख्याधिकारी श्रीमती सुरेखा भणगे शिंदे यांनी साथरोग अधिनियम, १८९७ आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये प्राप्त अधिकारातून माथेरान हद्दीतील सर्व आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा व मनोरंजनविषयक क्षेत्रातील कार्यांना कोविड-१९ सार्वत्रिक साथरोग येण्यापूर्वी, विविध स्थानिक किंवा इतर सक्षम प्राधिकरणांनी ठरविलेल्या सर्वसाधारण वेळानुसार, पुढील शर्तींच्या अधीन राहून, खुले करण्याचे आदेश जारी केले आहेत.



माथेरान हे एक पर्यटनस्थळ आहे व येथे देशविदेशातून अनेक पर्यटक येत असतात त्यामुळे खबरदारी म्हणून माथेरान प्रवेशद्वारावर येणाऱ्या पर्यटकांसाठी वैद्कीय कक्ष स्थापन केले असून त्याठिकाणी माथेरानमध्ये येणाऱ्या प्रत्येक पर्यटकांची वैद्कीय तपासणी करूनच त्यांना माथेरानमध्ये प्रवेश दिला जातो त्याच बरोबर येथे वाहतुकीसाठी वापरात येणाऱ्या अश्व चालक व ग्राहकांनाही मास्क अनिवार्य केला असून मास्क चा वापर न करणार्यांना ५०० रू दंड केला जाणार आहे.

संपूर्ण लसीकरण झालेला पुरावा प्रवेशद्वारावर तपासला जाणार असून आवश्यकता वाटल्यास अँटीजेन तपासणी ही केली जाणार आहे कोरोना अनुरूप वर्तनाची तपशीलवार मार्गदर्शक तत्वे तसेच त्याचे उल्लंघन केल्यास करावयाचे दंड कोविड अनुरूप वर्तनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार आणि यात यापुढे नमूद केलेल्या दंडांनुसार असेल. या आदेशाचे/सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती/आस्थापना दंडात्मक कारवाईस तसेच भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, २६९, २७०, २७१ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम ५१ सह अन्य तरतूदींनुसार फौजदारी शिक्षेस पात्र राहतील, असे मुख्याधिकारी श्रीमती सुरेखा जी भणगे यांनी नमूद केले.

> माथेरानचे संपूर्ण जनजीवन हे पर्यटनावर अवलंबून असल्याने माथेरान हे कोरोना प्रभावापासून सुरक्षित असणे गरजेचे आहे त्यामुळेच येथील जनतेच्या व पर्यटनाच्या दृष्टिकोनातून काही कायदे सक्तीने अंमलात आणणे गरजेचे असून त्यामुळे काही काळ नागरिकांनी शासन नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
>
> **श्रीमती सुरेखा भणगे शिंदे**
> **मुख्याधिकारी माथेरान**

## पाच दहा लाख खर्च टाकणाऱ्यांची टीमकी वाजवायची हे बंद करा : आ.भरतशेठ गोगावले

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील अनेक रस्ते राज्यसरकारकडे वर्ग करून त्यासाठी कोटयवधी रूपयांचा निधी आणायचे काम आम्ही शिवसेनेच्या माध्यमातून करीत असताना जनतेतील काहींनी पाच-दहा लाख रूपयांची कामे करणाऱ्यांची टीमकी वाजवायची, हा दिशाभूल करण्याचा प्रकार बंद झाला पाहिजे.



चरई ग्रामपंचायतीप्रमाणेच आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका तसेच पोलादपूरची नगरपंचायत या माध्यमातून शिवसेनेने केलेल्या विकासकामांबाबत आपले प्रेम व्यक्त करा, असे आवाहन महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या चरई प्राथमिक शाळा येथे केले.

पोलादपूर शहरानजिकच्या चरई ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकासकामांच्या उदघाटनप्रसंगी आ.गोगावले बोलत होते. याप्रसंगी आ.गोगावले यांच्यासोबत व्यासपिठावर राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, पंचायत समिती सदस्य यशवंत कासार, गटविकास अधिकारी जगताप, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, माजी राजिप महिला बालकल्याण सभापती संगिता कासार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता सुर्वे, स्थानिक सरपंच अनिता साळवी, उपसरपंच सुशांत कदम, निलेश कंक तसेच विविध प्रभागातील ग्रामस्थ महिला आदी उपस्थित होते.

आ.गोगावले यांनी आपल्या भाषणामध्ये पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुकांवेळी मतदारांनी सहकार्य केल्यास आम्ही पाचही वर्षे आपणास सहकार्य करणार आहोत, अशी ग्वाही दिली.

आ.भरतशेठ गोगावले यांच्याहस्ते चरई गावदेवी मंदिराकडे जाणारा रस्त्याचे भुमिपूजन, बौध्दवाडीतील सामाजिक सभागृहाचे उदघाटन आणि चरई प्राथमिक शाळा ते रानवडी रस्त्याचे भुमिपूजन असे कार्यक्रम करण्यात आले.

याप्रसंगी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे यांनी, पोलादपूर तालुक्यातील सुमारे दहा महत्वाचे रस्ते आम्ही गेल्या वर्षभरात रायगड जिल्हा परिषदेकडून राज्यसरकारकडे वर्ग केले असून चरई ते रानवडीच्या रस्त्यासाठी एमआयडीसीतून आ.गोगावले यांच्या माध्यमातून निधी प्राप्त केला आहे, अशी माहिती दिली.

चरई ग्रामस्थांनी आ.गोगावले यांच्या दौऱ्याप्रसंगी भरपावसातही वाट पाहून गावदेवीच्या मंदिरामध्ये आमदारांच्या यशासाठी साकडे घातले असताना आ.गोगावले यांनी जनतेच्या मनात जे काय असेल ते होऊ दे, असे साकडे मानाई, जननी, काळकाई, चेडा या ग्रामदैवतांना घातले. याप्रसंगी मुख्याध्यापक शाम लवंगारे, ग्रामसेविका त्रिशिला गंभीरे, देवस्थानचे अध्यक्ष, ग्रामस्थ किसन कुर्डे तसेच ग्रामपंचायत सदस्य आणि कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त ०८ डिसेंबरला 'कुस्त्यांच्या खुल्या दंगली'

**दै.रायगड नगरी । पनवेल**



भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवानिमित्त पनवेल तालुका कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने आणि माजी जिल्हा परिषद सदस्य, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील व बेलवली विभागीय अध्यक्ष सतिश पाटील यांच्या वतीने ०८ डिसेंबर रोजी 'कुस्त्यांच्या खुल्या दंगली' आयोजित करण्यात आल्या आहेत.

अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस नुकताच विविध समाजोपयोगी उपक्रमात साजरा झाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त या 'कुस्त्यांच्या खुल्या दंगली' चे आयोजन २२ नोव्हेंबरला करण्यात आले होते. मात्र अवकाळी पावसामुळे या दंगली तात्पुरत्या रद्द करण्यात आल्या होत्या. आता ०८ डिसेंबरला दुपारी १. ३० वाजता बेलवली- वारदोली येथील माऊली मैदानावर या कुस्त्यांच्या दंगली होणार असून या दंगलीचा कुस्ती प्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील व बेलवली विभागीय अध्यक्ष सतिश पाटील यांनी केले आहे.